38

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.


:: प्रधान कार्यालय ::

" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,

फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९


# वाहन तारण कर्ज
# (सुधारीत)

Z:\Vaishu\Karj Dhoran 2026\Date 01.01.2026\Individual\Covering.Doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

## -:: सुधारीत वाहन तारण कर्ज धोरण ::-

**दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह कर्ज धोरण**
मा.संचालक मंडळ सभा दिनांक ३०/०४/२०१९, ठराव क्रमांक : २८ अन्वये मंजूर
**मा.संचालक मंडळ सभा दिनांक २९/०५/२०२६,ठराव क्रमांक ८ अन्वये मंजूर**

**कर्जाचा उद्देश :-**

**१) वैयक्तिक वापरासाठी नविन वाहन खरेदी करणेसाठी :-**
यामध्ये स्कुटर, अॅक्टीवा, मोटर सायकल, बुलेट, कार व जीप, **इलेक्ट्रिक वाहन** या वाहनांचा समावेश आहे.

**व्यवसायीक वापरासाठी :-**

**१) वैयक्तिक वापरासाठी नविन वाहन खरेदी करणेसाठी :-**
यामध्ये स्कुटर, अॅक्टीवा, मोटर सायकल, बुलेट, कार व जीप या वाहनांचा समावेश आहे.
यामध्ये जीप, टेम्पो, टुरिस्ट बसेस (टेम्पो ट्रॅव्हलर / स्कुलबस / कंपनीबस)
ट्रक / लॉरी, डंपर, स्वयंचलीत यांत्रिकी बोट, जेसीबी व रोड रोलर इत्यादी या वाहनांचा समावेश असणाऱ्या वाहनांना कर्ज पुरवठा केला जाईल. (रिक्षा, काळी-पिवळी टॅक्सी, ओला व उबेर कंपनीसाठी व तत्सम कंपन्यामार्फत चालविण्यात येणाऱ्या वाहनांना कर्ज पुरवठा करण्यात येणार नाही.) (४५/१० वी संचालक मंडळ सभा दिनांक ०७/११/२०१९ नुसार )

**अर्जदाराचे पात्रता निकष :-**

१) बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कायम वास्तव्य असलेले अर्जदार कर्ज मागणीस पात्र असतील.
(मुंबै बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कायम वास्तव्याचा पुरावा म्हणून घर खरेदी खत, मासिक मेंटेनन्स बील / पावती, अद्यावत लाईट बील यापैकीं एकाची छायांकित प्रत सादर करावी लागेल.)

२) अर्जदारास **किमान विविध** भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) अर्जदाराकडे वाहन परवाना (ड्रायव्हींग लायसन्स) असणे अनिवार्य आहे.

४) अर्जदार खरेदी करीत असलेल्या वाहनाची नोंदणी रिजनल ट्रान्सपोर्ट ऑफीस, मुंबई येथेच करणे आवश्यक राहील.

५) अर्जदारास फक्त नविन वैयक्तिक (खाजगी) व व्यावसायिक वापरासाठीच्या वाहनासाठीच कर्ज मंजूर करण्यात येईल यामध्ये रिक्षा, काळी-पिवळी टॅक्सी, ओला, उबेर व तत्सम या कंपन्यासाठीची वाहने खरेदीसाठी तसेच कोणत्याही जुन्या (सेकंड हॅण्ड) वाहनासाठी कर्ज मंजूर करण्यात येणार नाही.

६) अर्जदार बँकेच्या कार्यक्षेत्रात भाडेकरारावर घर घेवून वास्तव्य करीत असेल तर ती व्यक्ती कर्ज मागणीस अपात्र आहे.

७) अर्जदाराने रु.१०.०० लाखाच्या कर्जास एक व रु.१०.०० लाखावरील रु.४०.०० लाखापर्यंतच्या कर्जास दोन सक्षम जामिनदार देणे आवश्यक राहील. (दिनांक १४/१२/२०२२ रोजीची कर्ज विभागाची कार्यालयीन सूचनेनुसार)

(३६)



**८) कर्जदारांकडून दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता कर्ज मागणी रक्कमेच्या ०.५०% किंवा कमीत कमी रु.१०००/- व जास्तीत जास्त रु.१०,०००/-अधिक करासह आयकर कायदयानुसार सर्व्हिस टॅक्स इतकी विना परतावा कर्ज प्रस्ताव हाताळणी शुल्क (प्रोसेसिंग फी)द्यावी लागेल.**

९) अर्जदाराकडे कर्ज परतफेड क्षमता नसेल तर सहअर्जदार म्हणून कुटूंबातील व्यक्ती घेण्यास अनुमती असेल. मात्र सहअर्जदार म्हणून कुटुंबाबाहेरील व्यक्तीस घेता येणार नाही.

१०) अर्जदार, सहअर्जदार व जामिनदार यांचा सिबील स्कोर बँकेच्या प्रचलित नियमानुसार असावा.

**११) कर्ज परतफेड क्षमता, कर्ज मंजूरी पात्रता, नियमित आयटीआर असेल तर ७ पट किंवा अनियमित असेल तर १ पट असावी.**

**कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

१) कर्ज मागणी अर्ज (बँकेच्या विहीत नमुन्यातील)

२) वाहनाचे अधिकृत विक्रेताकडील वाहन किंमतीचे कोटेशन (मुळ प्रत)

३) वाहन बुकींग रक्कम भरल्याची मुळ पावती.

४) अर्जदाराचा वाहन परवाना (ड्रायव्हींग लायसन्स)

५) व्यावसायिक वापरासाठीच्या वाहनासाठी **गुमास्ता परवाना/ उद्यम आधार**

६) अर्जदार / सहअर्जदार यांची के. वाय. सी.

७) व्यावसायिक वापरासाठीच्या वाहनासाठी सनदी लेखापाल यांचा प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करणे आवश्यक आहे.

**अ)** १) आधारकार्ड, २) पॅनकार्ड, ३) लाईट बील, (मागील महिन्याचे)
४) रेशनिंग कार्ड – **तसेच इतर सर्व आवश्यक दस्तऐवज**

**ब) अर्जदार / सहअर्जदार नोकरदार असेल तर,**

१) मागिल ६ महिन्याच्या पगारस्लीप.

२) पगार ज्या बँकेत जमा होतो त्या बँक खात्याचे १ वर्षाच्या नोंदी असलेले बँक स्टेटमेंट किंवा

पासबुकाची छायांकित प्रत.

३) मागिल तीन वर्षाची आयकर विवरण (IT Return) पत्रके.

४) फॉर्म नं.१६ ची छायांकित प्रत.

**क) अर्जदार व्यावसायिक असेल तर :-**

१) व्यवसायाच्या जागेचा पुरावा :- जागा स्वमालकीची असेल तर **खरेदी खत / भाडेतत्वावर असेल तर भाडे करार,** गाळा खरेदी खत, मासिक मेंटेनन्स बील / पावती, अद्यावत लाईट बील यापैकी कोणतीही दोन कागदपत्रे किंवा व्यवसायाची जागा भाडेकरारावर असेल तर नोंदणीकृत भाडेकराराची छायांकित प्रत.

२) सी.ए.प्रमाणित आयकर विवरण पत्र (मागिल ३ वर्षाचे)

३) बँक खाते उतारा (मागील १ वर्षाचा) स्व:ताच्या व व्यवसायाच्या खात्याचा.

७) **जामिनदार यांची के.वाय.सी. व इतर कागदपत्रे :-**

**अ)** १) आधारकार्ड, २) पॅनकार्ड, ३) लाईट बील, (मागील महिन्याचे) ४) रेशनिंग कार्ड –
**तसेच इतर सर्व आवश्यक दस्तऐवज**

**ब) जामिनदार नोकरदार असेल तर,**

१) मागिल ६ महिन्याच्या पगारस्लीप.

२) पगार ज्या बँकेत जमा होतो त्या बँक खात्याचे १ वर्षाच्या नोंदी असलेले बँक स्टेटमेंट किंवा पासबुकाची छायांकित प्रत.

३) मागिल तीन वर्षाची आयकर विवरण (IT Return) पत्रके.

४) फॉर्म नं.१६ ची छायांकित प्रत.

**क) जामिनदार व्यावसायिक असेल तर :-**

१) **व्यवसायाच्या जागेचा पुरावा :-** जागा स्वमालकीची असेल तर **खरेदी खत / भाडेतत्वावर असेल तर भाडे करार,** गाळा खरेदी खत, मासिक मेंटेनन्स बील / पावती, अद्यावत लाईट बील यापैकी कोणतीही दोन कागदपत्रे किंवा व्यवसायाची जागा भाडेकरारावर असेल तर नोंदणीकृत भाडेकराराची छायांकित प्रत.

२) सी.ए.प्रमाणित आयकर विवरण पत्र (मागिल ३ वर्षाचे)

३) बँक खाते उतारा (मागील १ वर्षाचा) स्व:ताच्या व व्यवसायाच्या खात्याचा.

**कर्ज मंजूरीचे निकष** :- कर्ज धोरणानुसार सादर केलेल्या सर्व कागदपत्राची तसेच अर्जदाराची बँक कर्ज परतफेड क्षमता या बाबींची बँकेच्या अधिकाऱ्यांनी तपासणी करुन छाननी अहवालामध्ये कर्ज मंजूरीस शिफारस केलेले प्रस्ताव पात्र होतील.

**कर्ज मर्यादा** :- (बँकेने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या वैयक्तिक कर्ज वाटपाची कमाल मर्यादा लागू राहील)

| अ.क्र | **वैयक्तिक वापरासाठीचे** | **व्यावसायिक वापरासाठीचे वाहन** |
|---|---|---|
| १) | वाहनाची मुळ किंमत रु.________ | १) वाहनाची मुळ किंमत रु.______ |
| २) | रजिस्ट्रेशन रु.____________ | २)रजिस्ट्रेशन रु._______ |
| ३) | इन्शुरन्स (प्रथम वर्षाचा फक्त) रु._____ | ३) इन्शुरन्स (प्रथम वर्षाचा फक्त) रु.___ |
| ४) | सी.एन.जी. कीट कंपनीचे रु._____ | ४) सी.एन.जी. कीट कंपनीचे/रु.________<br>किंवा बाहेरुन बसविणेसाठी |
| ५) | **इलेक्ट्रिक किट कंपनीचे**____<br>एकूण रु.______<br>वजा डिस्काऊंट रु.___<br>एकूण – | **इलेक्ट्रिक किट कंपनीचे**_______<br>एकूण रु._______<br>वजा डिस्काऊंट रु.________<br>एकूण – |
| | त्याचे ९०% | त्याचे ८०% |

(३८)



बँक कर्ज परतफेड क्षमता विचारात घेवूनच कर्ज मर्यादा निश्चीत केली जाईल. कर्ज मंजूरीची रक्कम अधिकृत विक्रेत्यास व व्यावसायिक वाहनासाठी बाहेरुन सी.एन.जी.किटसाठीची रक्कम संबंधीतास बँकेच्या RTGS / NEFT सुविधेद्वारेच अदा करण्यात येईल.

**कर्ज परतफेड कालावधी :-**

**६० महिने :-** अर्जदाराचे ६० समान मासिक परतफेडीच्या हफ्त्यांनी कर्ज परतफेड करणे आवश्यक राहील.

**व्याजदर** :- दुचाकीकरीता ३ वर्षापर्यंत ९.२५%, ३ ते ५ वर्षाकरीता ९.५०% व चारचाकी करीता ५ वर्षापर्यंत ९% (व्यवसायीक वाहन कर्ज वगळता)

**व्याजदर :-** बँकेने वाहन तारण कर्जासाठी वेळोवेळी निश्चीत केलेला व्याजदर लागू राहील.

**कर्ज उचलीचेवेळी सादर करावयाची कागदपत्रे :-**

1) Letter of Acceptance
2) Agreement of Loan
3) Promissory Note
4) Agreement of Hypothecation of Vehicle
5) Letter of Continuity
6) Recovery of loan Installment
7) Agreement by borrower for deducting installment from Salary or Wages (पगारदार अर्जदारासाठी)
८) Agreement by Sureties for deducting installment from Salary or Wages (पगारदार जामिनदारासाठी)

**वाहन कर्ज उचलीनंतर कर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे :-**

१. वाहन विक्रेत्याकडील रक्कम पोहोच झाल्याची मुळ पावती.
२. वाहन डिलीव्हरी चलन.
३. वाहनाची डुप्लीकेट चावी शाखेत जमा करावी लागेल.
४. वाहनाचे परमीट.
५. वाहनाचे आर.सी.बुक बँकेचा बोजा नोंद करुन मुळ प्रत सादर करावी.
६. वाहनाच्या विमा पॉलिसीची मुळ प्रत.
७. वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट.
८. TTO फॉर्म

**सर्वसाधारण नियम, अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-**

१. बँकेच्या नाममात्र / नामधारी सभासद असलेल्या व्यक्तिस कर्ज पुरवठा केला जाईल. (कर्ज मागणी करणा-या व्यक्तिस व जामिनदारास नामधारी / नाममात्र सभासद (Nominal Member) व्हावे लागेल.)
२. कर्जदाराने खरेदी केलेल्या वाहनाचे नजरगहाणखत बँकेच्या नावाने करुन द्यावे लागेल.
३. कर्जदाराने खरेदी केलेल्या वाहनाची कर्जदार व बँक यांचे संयुक्त नावे नोंद प्रादेशिक परिवहन कचेरी मुंबई (आर.टी.ओ.) यांचेकडे करावी लागेल.

४. सदरचे कर्ज वैयक्तिक कर्जदारांना दिले जाणार आहे. खाजगी वाहतूक कंपनीना कर्ज दिले जाणार नाही.

५. कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार ज्या शाखेतून कर्जाची उचल घेणार आहे तेथे बचत खाते उघडणे आवश्यक आहे. व्यावसायिक वापरासाठी वाहन घेणाऱ्या व्यावसायिकाचे चालू खाते उघडावे लागेल व व्यवसायाचा सर्व व्यवहार या खात्यातून करावा लागेल.

६. दरमहा कर्ज हप्ता देय तारखेपर्यंत भरला नाही तर बँक कर्ज धोरणानुसार लेट पेमेंट चार्जेस आकारले जातील.

७. कर्जाचे सलग तीन हप्ते थकीत झाल्यास वाहन जप्त करणेचा बँकेस अधिकार राहील. वाहन जप्तीसाठी येणारा अनुषंगिक खर्च कर्जदाराच्या / सहकर्जदाराच्या, जामिनदाराचे खात्यास नावे टाकला जाईल/अथवा वसुल केला जाईल.

८. कर्जदाराने उतरविलेल्या विमा पॉलीसीचे हप्ते भरणे, मुदत संपताच नुतनीकरण करुन घेणे यांची सर्वस्वी जबाबदारी कर्जदाराची राहील. तसेच कर्जदारावर संबंधीत कर विहीत वेळेत भरण्याची जबाबदारी राहील. विमा पॉलिसी बँकेच्या ताब्यात राहील.

९. कर्जदाराकडून दुचाकी ते चारचाकी वाहनाकरीता कर्ज मागणी रक्कमेच्या ०.५०% किंवा कमीत कमी रु.१,०००/- व जास्तीत जास्त रु.१०,०००/- अधिक आयकर कायद्यानुसार सर्व्हीस टॅक्स इतकी विना परतावा (Non Refundable) कर्ज प्रस्ताव हाताळणी शुल्क (Processing Fees) द्यावी लागेल.

१०. वाहन सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी कर्जदाराची राहील. सदरचे वाहन तपासणीसाठी दर सहामाहीस बँकेत उपलब्ध करुन द्यावे लागेल. त्याची जबाबदारी कर्जदारावर राहील.

११. सदर कर्जातून घेतलेल्या वाहनाचा गैरवापर होत असल्याचे आढळून आल्यास त्यास बँक जबाबदार नसेल अशा परिस्थितीत वाहन जप्त करण्याचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

१२. सदर वाहनांवर "मुंबै बँकेच्या सौजन्याने" असा शेरा लिहिलेला असावा.

१३. व्यावसायिक वापरासाठी वाहन खरेदी करणाऱ्या कर्जदाराने व्यवसायातून दैनंदिन प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातील कमीत कमी ८०% इतकी रक्कम बँकेच्या चालू खात्यावर जमा करणे कर्जदारावर बंधनकारक राहील.

१४. अर्जदार / सहअर्जदारांचा कर्ज हप्ता जरी ECS अथवा पगारकपात /खात्यावरुन वर्ग होणार असला तरी १२ कोरे आगाऊ सहया केलेले धनादेश द्यावे लागतील.

१५. कर्जावरील व्याजदारामध्ये वेळोवेळी होणारे बदल कर्जदारावर बंधनकारक राहातील.

१६. कोणतेही कारण न देता अथवा एखाद्या अटीची पूर्तता न केल्यास कर्ज नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील.

१७. कर्जदार अन्य वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

१८. कर्ज अटीमध्ये बदल करणे, जादा अटींचा समावेश करणे अथवा रद्द करणे याबाबतचा अधिकार बँकेस राहील. कर्ज अटीमध्ये होणारे बदल कर्जदारावर बंधनकारक राहतील.